ई-मेल :- cmdt.srpf6.dhule@mahapolice.gov.in
srfrgr6@rediffmail.com
दूरध्वनी क्रमांक 02562-279434/35

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**समादेशक**
**राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक6,धुळे यांचेकार्यालय,**
**महिंदळे शिवार, साक्री रोड, सुरत बायपास हायवे,**
**धुळे - 424001.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमाक:- समादेशक गट-6/रारापोबल/वर्ग-4/भरती जाहिरात/2022/2012 धुळे, दिनांक :-14/03/2022

# -: जाहिरात : -

## चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांची सरळसेवा भरती - 2022

समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक 6, धुळे यांचे आस्थापनेवरील वर्ग-4 (गट-ड) चे रिक्त पदे भरणे करीता सरळसेवा भरती आयोजित करण्यात येत असून, भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून खालील अटींच्या अधिन राहून ऑफलाईन पध्दतीने आवेदन अर्ज मागविण्यात येत आहे.

## भरावायाच्या पदांचा तपशिल

**1. स्वयंपाकी (भोजन सेवक)-17 पदे**

| | अजा | अज | विजा(अ) | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | ईडब्ल्युएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | 02 | 04 | 01 | 00 | 01 | 01 | 00 | 03 | 02 | 03 | 17 |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 01 | 02 | 01 | - | 01 | 01 | - | 02 | 01 | 02 | 11 |
| महिला 30% | 01 | 01 | - | - | - | - | - | 01 | 01 | 01 | 05 |
| खेळाडू 5% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्प ग्रस्त 5% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त 2% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजीसैनिक 15% | - | 01 | - | - | - | - | - | - | - | - | 01 |
| अंशकालीन पदवीधर 10% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अनाथ 1% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| एकूण | 02 | 04 | 01 | 00 | 01 | 01 | 00 | 03 | 02 | 03 | 17 |

**2. सफाईकामगार -2 पदे**

| | अजा | अज | विजा(अ) | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | ईडब्ल्युएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | - | - | - | - | - | - | - | - | - | 02 | 02 |
| एकूण | - | - | - | - | - | - | - | - | - | 02 | 02 |

**टिप** :- वर दर्शविलेली पदे, आरक्षण व संख्याबळात बदल होण्याची शक्यता आहे. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी म्हणजेच समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक 6, धुळे यांना राहतील. त्याबाबत उमेदवारास अथवा कुणासही कोणतेही प्रकारचा दावा करण्याचे हक्क राहणार नाही.

**3. वेतन श्रेणी व शैक्षणीक अर्हता**

| अ.क्र | पदाचे नाव | वेतन श्रेणी | शैक्षणीक अर्हता |
|---|---|---|---|
| 1 | **भोजन सेवक** | (एस-1)15000-47600 | ज्याला शासनाने किंवा इतर प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या शाळेतून ईयत्ता सातवी मधून बढती दिलेली आहे. |
| 2 | **सफाईकामगार** | | |

**आवेदन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक**

जाहिराती मध्ये नमुद अटींची पुर्तता करणारे भोजन सेवक व सफाईकामगार या पदाकरीता ऑफलाईन अर्ज खालील नमूद विहीत दिनांकांच्या मुदतीत ऑफलाईन पध्दतीनेसादर करु शकतात.

| | | |
|---|---|---|
| 1 | आवेदन अर्ज सादर करण्याचा दिनांक | दि. 15.03.2022 पासून रोज सकाळी 10.00 ते 17.00 वाजे पावेतो |
| 2 | आवेदन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. 04.04.2022 रोजी वेळ 18.00 वाजे पर्यंत. |
| 3 | उमेदवारांना वर्ग 4 भरतीच्या संपूर्ण भरती प्रक्रियेची माहिती, रुपरेषा (Schedule) संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली असून वेळोवेळी होणारे बदल देखील याच संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील. | https://www.maharashtrasrpf.gov.in या संकेतस्थळावर गट क्रमांक 6, धुळे या Tab वर |

**4. भोजन सेवक व सफाईगार या पदांकरीता खालील प्रमाणे आवेदन अर्ज उपलब्ध राहतील :-**

(1). **भोजनसेवक व सफाईगार या पदाकरीता ऑफलाईन अर्ज प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याने उमेदवार यांचे करीता आवेदन अर्ज समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक 6, धुळे येथील पोलीस कल्याण शाखा येथे दिनांक 15.03.2022 पासुन दिनांक 04.04.2022 पावेतो सकाळी 10.00 ते 17.00 वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.** तसेच राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे https://www.maharashtrasrpf.gov.in या संकेतस्थळावर गट क्रमांक 6, धुळे या Tab वर उपलब्ध राहतील. दिलेल्या वेळेनंतर प्राप्त झालेल्या आवेदन अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. (**आवेदन अर्जास कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येणार नाही.**)

(2). सदर आवेदन अर्ज जमा करतेवेळी उमेदवारांनी आवेदन अर्ज बिनचुक परिपुर्ण भरुन व सोबत आवश्यक कादपत्रांच्या छायांकीत साक्षांकित प्रती जोडून सोबत खालील प्रमाणे नमुद शुल्काचा डिमांड ड्राफ्ट (राष्ट्रीयकृत बँकेचा असावा) अथवा पोस्टल ऑर्डर ADJUTANT SRPF Gr.VI DHULE यांचे नावे काढून सदर आवेदन अर्ज व डिमांड ड्राफ्ट अथवा पोस्टल ऑर्डर समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक 6, धुळे यांचे कार्यालयात जाहिराती मध्ये नमुद केलेल्या दिनांकास समक्ष आणून द्यावेत किंवा टपालाव्दारे दिनांक 04.04.2022 रोजी 18.00 वाजेपर्यंत प्राप्त होतील अशा बेताने पाठविण्यात यावेत. (**आवेदन अर्जासोबत कोणत्याही प्रकारचा धनादेश किंवा रोख रक्कम स्विकारली जाणार नाही**)

(3). जाहिरातीत दिलेल्या वेळेत आवेदन अर्ज प्राप्त न झाल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच आवेदन अर्जासोबत आवश्यक कादपत्रांच्या छायांकीत साक्षांकित प्रती जोडून खालील प्रमाणे नमुद शुल्काचा डिमांड ड्राफ्ट (राष्ट्रीयकृत बँकेचा असावा) अथवा पोस्टल ऑर्डर सोबत जोडणे आवश्यक राहील. (**मुळ कागदपत्रांची सुची मुद्या क्रमांक 9 मध्ये दर्शविण्यात आली आहे.**)

**4. अर्जासोबत आकारण्यात येणारा शुल्क :-**

| अ.क्र. | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|
| 01 | 300/- | 150/- |

**6. वयोमर्यादा (Cut Off Date):-** दिनांक 31.03.2022 रोजी किमान व कमाल वयोमर्यादा खालील प्रमाणे राहिल.

| अ.क्र | पदनाम | वयोमर्यादा |
|---|---|---|
| 1 | **भोजनसेवक** | वयोमर्यादा दि. 31.03.2022 रोजी कमीत कमी वय 18 व जास्तीत जास्त वय 38 वर्षेपर्यंत असावे. मागासवर्गीय उमेदवारांकरीता वय 43 वर्षे (तसेच सामाजिक आणि समांतर आरक्षणनिहाय उमेदवारांना शासनाने वेळोवेळी घोषित केल्याप्रमाणे शिथिलक्षम राहिल.) (शा.नि. क्रमांक एसआरव्ही-2015/प्र.क्रमांक404/ कार्यालय/12, दि.25 एप्रिल 2016) |
| 2 | **सफाईकामगार** | वयोमर्यादा दि. 31.03.2022 रोजी कमीत कमी वय 18 व जास्तीत जास्त वय 38 वर्षेपर्यंत असावे. मागासवर्गीय उमेदवारांकरीता वय 43 वर्षे (तसेच सामाजिक आणि समांतर आरक्षणनिहाय उमेदवारांना शासनाने वेळोवेळी घोषित केल्याप्रमाणे शिथिलक्षम राहिल.) (साप्रवि अधिसूचना दिनांक 6 जून 2017) |

7. **अटीव शर्ती** :-

(1). उमेदवारास फक्त **एकाच पदासाठी** आवेदन अर्ज सादर करता येईल.

(2). मुद्या क्रमांक 5 मध्ये नमुद प्रमाणे आवेदन अर्जासोबत डिमांड ड्राफ्ट अथवा पोस्टल ऑर्डर आवश्यक राहील.

(3). महाराष्ट्र शासन सा.प्र.वि.अधिसुचना क्रमांक एसआरव्ही-2000/प्र.क्रमांक17/2000/12 दिनांक 28 मार्च 2005 व शासन परिपत्रक एसआरव्ही-2000/प्र.क्रमांक17/2000/12, दि. 1 जुलै 2005 नमुना "अ" नियम 4 अन्वये विहित नमुण्यातील **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र** सादरकरणे अनिवार्य आहे.

(4). आवेदन अर्जात आपली उच्चतम शैक्षणिक पात्रता नमुद करावी त्याबाबतचे प्रमाणपत्र आवेदन अर्जासोबत जोडण्यात यावे.

(5). महाराष्ट्र शासन, वित्त विभागास, शासन निर्णय क्रमांक अंनियो-1005/126/सेवा-4, दिनांक 31/10/2005 नुसार दिनांक 1 नोव्हेंबर 2005 रोजी व त्यानंतर निवड होण्याऱ्या उमेदवारास नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) लागू राहिल. तथापी त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजेच (महाराष्ट्र नागरीसेवा निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण नियम 1984) व सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच शासन, वित्त विभाग निर्णय क्रमांक अनियो 2012/प्र.क्रमांक96/सेवा-4, दि.27 ऑगस्ट 2014 नुसार नवीन पारिभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना यापुढे राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) या नावाने लागू होईल.

(6). नियुक्ती झाल्या नंतर महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981, मुंबई राज्य राखीव पोलीस बल अधिनियम-1951 व मुंबई राज्य राखीव पोलीस बल नियम 1959, मुंबई पोलीस नियमावली-1999 लागू राहिल व तसेच वर्ग 4 संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या अधिसुचना / शासन निर्णय / परिपत्रक आदेश लागु राहतील.

(7). निवड होणारे महिला/पुरुष उमेदवार यांना वारंवार कोणत्याही वेळी गटमुख्याल या व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्यात कोठेही (उदा :- गडचिरोली, गोंदीया, चंद्रपुर या नक्षलग्रस्त प्रभागासह) तसेच महाराष्ट्र राज्याबाहेर आंतर सुरक्षा बंदोबस्तासाठी कंपनी सोबत जावे लागेल.

8. **व्यावसायिक चाचणी** :-

| **अ.क्र.** | **पदनाम** | **चाचणी** |
|---|---|---|
| 01 | **भोजन सेवक** | **100 गुणांची व्यावसायीक चाचणी घेण्यात येईल** |
| 02 | **सफाईगार** | |

(1). सामान्य प्रशासन विभाग शानिक्रमांक प्रानिम-1216/प्र.क्रमांक65/16)13 -अ, दि.13 जुन 2018 नुसार व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. सफाईगार व भोजनसेवक यांची व्यावसायिक चाचणीच्या गुणांच्या आधारे, गुणवत्ते नुसार निवड यादी व प्रतिक्षा यादी सामान्य प्रशासन विभागाचे दि. 16/03/1999, दि.13/08/2014 व दि.19/12/2018 चे शुध्दीपत्रकामध्ये दिलेल्या निर्देशानुसार तयार करण्यात येईल.

(2). वरील पदांच्या भरतीसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास सर्व उमेदवारांची व्यावसायिक चाचणी घेणे शक्य / व्यवहार्य नसल्यास उमेदवारांची संख्या लक्षात मर्यादित होण्यासाठी व अधिक सक्षम उमेदवार उपलब्ध होण्याकरीता संबंधित निवड समिती सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्रमांक प्रमि1(प्र.क्र.65/16)13-अ, दिनांक 18 जून 2018 मधील नियम 8(1)(2) नुसार आधी चाळणी लेखी परीक्षेचा पर्याय निवडु शकेल.

9. **आवश्यक कागदपत्रे** :-

(1). पदाकरीता धारण करीत असलेली विहित अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र, गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला व पुढील शिक्षणाचे (असल्यास) गुणपत्रक / प्रमाणपत्र.

(2). जातीचे प्रमाणपत्र.

(3). उमेदवार महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकारी यांनी दिलेले अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.)

(4). जातीचे वैधता प्रमाणपत्र.

(5). अनुसुचीत जाती, EWS व खुला या प्रवर्गातील उमेदवार वगळून नॉनक्रिमीलीअर प्रमाणपत्र चालु वर्षाचे ग्राह्य धरण्यात येईल.

(6). आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) असलेबाबतचे प्रमाणपत्र.

(7). शासकीय / निमशासकीय अथवा अन्य प्रकारच्या नोकरीत असलेल्या उमेदवारांनी नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**टीप :- वर नमुद सर्व आवश्यक कागदपत्रे ही दिनांक** 31.03.2022 **पर्यंत निर्गमित केलेले असावे**.

10. **कागदपत्र पडताळणी व व्यावसायिक चाचणीसाठी उपस्थिती राहणेबाबत** :- उमेदवारांना कागदपत्र पडताळणी व व्यावसायिक चाचणीसाठी नियोजित स्थळी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. त्याकरीता कोणत्याही प्रकारचा दैनिक /प्रवास भत्ता देय राहणार नाही.

11. **मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे सोबत आणणे बाबत** :- कागदपत्र पडताळणी व व्यावसायिक चाचणीच्या वेळी सर्व मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे तसेच साक्षांकित छायांकीत प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. मुळकागदपत्रे / प्रमाणपत्र सोबत न आणल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

12. **समांतर आरक्षण** :-

| अ.क्र. | आरक्षण | तपशील |
|---|---|---|
| 1 | **महिला आरक्षण** | प्रवर्गानुसार रिक्त पदाचे 30 टक्के आरक्षण हे महिला उमेदवारासाठी लागू राहील. ज्या पदासाठी महिला उमेदवार उपलब्ध होणार नाहीत त्या पदावर पुरुष उमेदवाराची निवड करण्यात येईल. खुल्या प्रवर्गातील महीला उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याचे 2021-2022 या आर्थिक वर्षामध्ये प्रभावी असलेले नॉनक्रिमिलिअर प्रमाणपत्र बंधनकारक राहील. |
| 2 | **माजी सैनिक** | प्रवर्गानुसार 15 % ईतके समांतर आरक्षण सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील परिपत्रक क्रमांक RTA-1079/0/482/XVI-A, दि.16 एप्रिल 1981 आणि त्यानंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशान्वये निर्धारित केलेल्या अटी व शर्ती नुसार असेल. |

13. **महत्वाच्या सुचना** :-

(1). अर्जदारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

(2). निवड झालेले मागासवर्गीय उमेदवार यांना नियुक्ती आदेश निर्गमित केलेल्या तारखेपासुन 6 महिन्याच्या आत जात वैद्यता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(3). अर्जामध्ये नमुद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी असल्याचे आढळुन आल्यास संबंधीत उमेदवार अपात्र ठरेल व कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहिल.

(4). भरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारीरिक इजा / नुकसान झाल्यास त्यास शासन अथवा राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक 6, धुळे हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

(5). भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशीलेबाजी किंवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

(6). निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल. वैद्यकीय अहवाल प्रतिकुल असल्यास केलेली निवड / नेमणुक रद्द करण्यात येईल.

(7). जाहिरातीमधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील.

(8). भरतीप्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे/रद्द करणे, परीक्षेचा प्रकार, सामाजिक अथवा समांतर आरक्षणात अंशत:/पुर्णत: बदल करणे, संवर्ग निहाय एकुण रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिया संदर्भात वाद, तक्रार बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार समादेशक तथा भरती प्रमुख यांना असतील. त्याबाबत उमेदवारास अथवा इतर कोणासही दावा करता येणार नाही.

(9). उमेदवारास आवेदन अर्ज आणुन देणेकरीता तसेच व्यावसायिक चाचणी व भरती संदर्भातील ईतर कोणत्याही कामकाजावेळी स्वखर्चाने यावे लागेल.

(10). उमेदवारांनी कागदपत्र पडताळीस येतांना सोबत नजीकच्या काळात काढलेले पासपोर्ट साईजचे 5 फोटो आणणे आवश्यक आहे.

14. **निवडसुची कालावधी** :- सदर भरतीचे निवडसुची कालावधी हा शासनाने विहित केल्यानुसार 1 वर्षाकरीता विधीग्राह्य राहील. त्यानंतर निवडसुची व्यपगत होईल.

15. **आचार संहिता** :- आचार संहिता लागू झाल्यास अथवा निवडणुक प्रक्रिया सुरू झाल्यास भरती प्रक्रिया स्थगित करण्याचे अथवा पुढे ढकलण्याचे अधिकार समादेशक तथा भरती प्रमुखयांचे असतील.

16. **परीक्षा केंद्र** :- राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक 6, धुळे, महिंदळे शीवार, साक्री रोड, सुरत बायपास हायवे, धुळे - 424001.

17. **परीक्षा केंद्र, दिनांक व वेळ** :-

(1). उमेदवारास कागदपत्र तपासणी/प्रात्यकक्षिक करीता दिनांक कळविण्यात येईल तसेच सदरचे वेळापत्रक हे राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे **https://www.maharashtrasrpf.gov.in** या संकेतस्थळावर गट क्रमांक 6, धुळे या Tab वर उपलब्ध राहील.

(2). उमेदवारांना त्याना देण्यात आलेल्या दिनांकास राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक 6, धुळे, महिंदळे शीवार, साक्री रोड, सुरत बायपास हायवे, धुळे येथे सकाळी 06.00 वाजेपासून ते दुपारी 12.00 वाजेपावेतो प्रवेश देण्यात येईल. सदर वेळेनंतर आलेल्या उमेदवारांना प्रवेश देण्यात येणार नाही.

(3). परिक्षेचे वेळापत्रक तसेच भरती संदर्भातील संपुर्ण माहिती राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे **https://www.maharashtrasrpf.gov.in** या संकेतस्थळावर गट क्रमांक 6, धुळे या Tab वर उपलब्ध राहील.

**-: कार्यालयाचा पत्ता :-**

समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक 6, धुळे,
महिंदळे शिवार, साक्री रोड, सुरत बायपास, धुळे - 424001
दुरध्वनी क्रमांक :- 02562-279435, फॅक्स-02562-279434
ईमेल आय.डी. -cmdt.srpf6.dhule@mahapolice.gov.in

(स्वाक्षरीत-)

**( प्रल्हाद नि. खाडे )**
**समादेशक तथा भरती प्रमुख,**
**राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक 6,धुळे.**